**युनायटेड किंग्डम आणि मालदीवला पंतप्रधानांची भेट (23 – 26 जुलै 2025)**

20 जुलै 2025

युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान आदरणीय सर कीर स्टार्मर यांच्या निमंत्रणावरुन पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे 23 – 24 जुलै 2025 दरम्यान युनायटेड किंग्डमला औपचारिक भेट देणार आहेत. पंतप्रधान मोदी यांनी युनायटेड किंग्डमला दिलेली ही चौथी भेट असेल.

2. भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी हे पंतप्रधान स्टार्मर यांच्या समवेत चर्चा करतील. भारत- यूके द्विपक्षीय संबंधांचा विस्ताराने आढावा घेतील. उभय नेते प्रादेशिक आणि जागतिक महत्वाच्या विषयांवर देखील विचारांचे आदान-प्रदान करतील. पंतप्रधान हे महामहिम किंग चार्ल्स III यांची सौजन्य भेट घेण्याची शक्यता आहे. या भेटीदरम्यान, उभय बाजू व्यापार आणि अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम, संरक्षण आणि सुरक्षा, हवामान, आरोग्य, शिक्षण आणि नागरिक परस्पर संबंधांवर विशिष्ट लक्ष केंद्रित करुन सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी (CSP) प्रगतीचा आढावा घेतील.

3. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान हे 25 – 26 जुलै 2025 दरम्यान मालदीवला भेट देतील. मालदीवचे महामहिम राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुईझ्झू यांच्या आमंत्रणावरुन ही भेट प्रस्तावित असेल. पंतप्रधानांनी मालदीवला दिलेली तिसरी भेट ठरेल. महामहिम राष्ट्राध्यक्ष मुईझ्झू यांच्या कार्यकाळात एखाद्या राष्ट्र किंवा शासन प्रमुखाने मालदीवला दिलेली पहिलीच भेट ठरणार आहे.

4. पंतप्रधान हे मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाच्या 60 व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने आयोजित समारंभाचे मुख्य अतिथी असतील. 26 जुलै 2025 रोजी हा सोहळा पार पडेल. भेटीदरम्यान, पंतप्रधान हे महामहिम राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुईझ्झू यांची भेट घेतील. परस्पर स्वारस्याच्या विविध विषयांवर चर्चा करतील. ऑक्टोबर 2024 मध्ये मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांच्या भारत भेटीदरम्यान स्वीकारलेल्या 'सर्वसमावेशक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारी' साठी भारत-मालदीवच्या संयुक्त दृष्टीकोनाच्या अंमलबजावणीतील प्रगतीचा उभय नेत्यांच्या द्वारे सर्वंकष आढावा घेतला जाईल. भारताचा सागरी शेजारी असलेल्या मालदीव सोबतचे महत्व या भेटीमुळे अधोरेखित होईल. भारताचे 'नेबरहूड फर्स्ट' धोरण आणि व्हिजन ‘महासागर’ यादृष्टीने मालदीवचे विशेष स्थान राहिले आहे. द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि घनिष्ठ करण्यासाठी या भेटीच्या माध्यमातून उभय बाजूंना निश्चितच संधी उपलब्ध होईल.

नवी दिल्ली

20 जुलै 2025